
१८६७



# सुवर्ण

REFBK-0011764
REFBK-0011764

धांशु

म. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
सं. क्र. १८११

# गीत-सुवर्ण

भक्तिभाव-गीत-संग्रह

कवि

सुधांशु

ज्योत्स्ना प्रकाशन, मुंबई ४

मूल्य ७५ नये पैसे

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
REFBK-0011764
REFBK-0011764

© सुधांशु, १९६१

• प्रकाशक :
ल. गो. परांजपे
ज्योत्स्ना प्रकाशन
५५/१४ मुगभाट, मुंबई ४

• मुद्रक :
बा. ग. ढवळे,
कर्नाटक मुद्रणालय,
चिराबाजार, मुंबई २

• प्रथमावृत्ति
२६ जानेवारी १९६१

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे. स्वक्रमांक
अनुक्रम 49925 3645
दिनांक

श्री. आप्पासाहेब इनामदार
रजि० गांधर्व महाविद्यालय मंडळ
व
सौ. मालती इनामदार
यांना अर्पण



## सुधांशु–साहित्य

१ कौमुदी [ काव्य ]
२ विजयनी [ काव्य ]
३ जलवंती [ काव्य ]
४ उगव तारे [ प्रा. काव्य ]
५ दत्तजन्म [ संगीतिका ]
६ गीत-सुगंध [ भावगीत ]
७ गीत – सुवर्ण [ भावगीत ]
८ ने. स्वातंत्र्यसंग्राम [ पोवाडा ]
९ खडकांतील झरे [ लघुकथा ]
१० चतुरादेवी [ बालकथा ]
११ सुभाषकथा [ बालकथा ]

## भाव-फुलें

माझ्या गीतांवर महाराष्ट्रांतील रसिकांनीं अपार प्रेम केलें. माझा पहिला गीतसंग्रह 'गीतसुगंध' तर वर्ष संपण्यापूर्वीच संपला.

कुणाचे कसे आभार मानूं? कोणत्या शब्दांनीं? वृत्ति भारावते. शब्द थिटे पडतात.

माझ्या गीतांचे महाराष्ट्रांतील गायकगायिकांनीही खूप लाड केलें—कोड-कौतुक केलें. कुणाकुणाचा नामोल्लेख करूं?

कुणी भक्तिगीतें आळविलीं, कुणी गौळणीं रंगविल्या. कुणी भावगीत सजविलें. कुणी स्वरसाज दिला. या सर्वांबद्दल मी कृतज्ञ आहें.

ग्रामोफोन कंपनीचे—श्री. जी. एन्. जोशी, श्री. रेळे, श्री. कामेरकर, श्री. सोहनी यांचाही मी ऋणी आहें.

भारतीय नभोवाणीचें विस्मरण तर अशक्यच.

'गीतसुवर्णचे' प्रकाशक—श्री. ल. गो. परांजपे यांनीं या सुवर्णाचा सुंदर अलंकार बनवून रसिकांचे हातीं दिला आहे. त्यांचे आभार.

शेवटीं मराठी रसिकतेला मंगल प्रणाम.

सुधांशु

सुधांशु-सदन
औदुंबर [ सांगली ]
१४ जानेवारी १९६१

# दत्तदिगंबर

दत्तदिगंबर दैवत माझें
हृदयीं माझ्या नित्य विराजे !

अनसूयेचें सत्व आगळें
तिन्ही देवही झालीं बाळे
त्रैमूर्ती अवतार मनोहर
    दीनोद्धारक त्रिभुवनीं गाजे    १

तीन शिरें, कर सहा शोभती
हास्य मधुर शुभ वदनावरती
जटाजूट शिरीं, पायिं खडावा,
    भस्मविलेपित कांती साजे    २

पाहुनि प्रेमळ सुंदर मूर्ती
आनंदाचे आंसू झरती
सारे सात्विक भाव उमलती
    हळुं हळुं सरतें मीपण माझें    ३

—सुधांशु

# गाउंया दत्तदत्त वदनीं

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ........

गाउंया दत्तदत्त वदनीं
गाउंया दत्तदत्त भजनीं
तयावाचुनी कोण विसावा
मनुजाला त्रिभुवनीं !

त्रैमूर्ती हा दत्तदिगंबर
भस्मांकित तनु सतेज सुंदर
ऋषिमुनि ध्याती जया निरंतर
स्तविती सुर निशिदिनीं १

कळिकाळासी धाक जयाचा
मायबाप हा निजदासांचा।
शेष भागला, वेदपुराणें
थकलीं गुणगायनीं २

दत्तदिगंबर मधुर चंद्रमा
चकोर बनुनी सेवूं सुषमा
वारकरी अम्ही अमरपुरीचे
नाचूंया रंगणीं ३

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अनुक्रम........ वि: ........
क्रमांक........
नों. दि: ........

दत्तगुरू जय दत्तगुरू
भक्तजनांचा कल्पतरू !

अनसूयेचा होउनि नंदन
त्रैलोक्याचें फुलवी नंदन
तापदग्ध या मरुभूमीवर
लागे अमृतमेघ झरू १

हा योग्यांचा योगी गुरुवर
दासावरि करि मायापाखर
भवसागर अति दारुण त्यांतुन
पार कराया हो तारू २

दत्तगुरूपदिं जे जन रतले
जन्ममृत्युभय त्यांचें सरलें
पाप ताप अन् दैन्य हराया
दत्तगुरूचे चरण धरूं ३

# पाहुंया दत्तात्रय मूर्ती

पाहुंया दत्तात्रय मूर्ती
मुखानें गाऊं गुण कीर्ती !

गुरूची भस्मांकित काया
जटेचा शोभे भार जया
तपाची तेजस्वी कांती १

गुरूवर योग्यांचा योगी
विरागी आत्मसुखा भोगी
अंतरीं सुरही आळविती २

गुरू हा करुणेचा सिंधू
गुरू हा दीनाचा बंधू
गुरुपदीं सर्व सुखें वसती ३

गुरूला भावफुलें वाहूं
कृपेच्या अमृतांत न्हाऊं
निरंतर पावूं सुखशांती ४

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
५१९२८ ३५५
९८८ ७।६।६०

घडिघडी स्मरतें मी अंतरीं
गुरूची प्रतिमा ती साजिरी !

वदनीं शांती, कांती सुंदर
तेज पाहुनी लाजे भास्कर
करुणादृष्टी बघे चराचर
अथांगमाया उरीं १

ध्यान शुभंकर त्रैमूर्तीचें
भान हरपवी तनूमनाचें
ऋषीमुनीही नित्य पूजिती
हृदयाच्या मंदिरीं २

दत्तगुरू मी सतत चिंतितें
गुरुनामीं मी रंगुन जातें
मंगल चरणीं हळूं अर्पितें
भावगीत मंजिरी ३

## सखे मी औदुंबर पाहिलें

सखे मी औदुंबर पाहिलें
गुरूचे दिव्य चरण वंदिले !

कृष्णा वाहे शांत मनोहर
निसर्ग नटला अनुपम सुंदर
वृक्षवरांच्या कुशींत हरिचें
वैकुंठच शोभलें १

विमल पादुका तीरावरती
हृदयिं निरंतर सुरगण ध्याती
ध्यानीं मी रंगता अनावर
देहभाव लोपले २

क्षणांत विरुनी सारी खळबळ
झालें अंतर प्रशांत निर्मळ
त्या शांतीच्या सुखांत अजुनी
मन माझें रंगलें ३

## कौसल्येचें शतजन्मींचें भाग्य फळा आलें

कौसल्येचें शतजन्मींचें
भाग्य फळा आलें
हिचिया उदरीं वैकुंठीचें
परब्रह्म जन्मलें !

अंधारांतुन प्रकाश उमले
दशरथजीवन कृतार्थ झालें
रघुवंशाचें नाम सुमंगल
त्रिभुवनांत उजळलें १

अवतरले श्री रघुपतिराघव
देव मांडिती नभीं महोत्सव
आणि उधळिती अयोध्येवरी
कल्पतरूचीं फुलें २

वेडी झाली गोकुळ नगरी
हर्ष न माये पुरी अंबरीं
हर्षोन्मादें चराचरांच्या
हृदयीं नंदन डुलें ३

निर्भय झाले देव मुनीवर
थरथरलें असुरांचें अंतर
राम जन्मतां पृथ्वीवरती
धर्मराज्य जन्मलें ४

# सखि हेत मनींचे पुरतिल कां ?

सखि हेत मनींचे पुरतिल कां ?
श्री रघुपति माझे होतिल कां ?

रघुरायाचें रूप गोजिरें
मंगलकीर्ती गाती वारे
शामसुलोचन दशरथनंदन
जनकसुतेला वरितिल कां ? १

स्वयंवराचा भरला मांडव
त्यांत शोभती माझे राघव
कोमल अपुल्या कमलकरांनीं
शिवचापाते धरितिल कां ? २

लवे पापणी, बोले कोकिल
शुभ शकुनाची येते चाहुल
सांग सखे ग राम मदनतनु
मजला 'माझी' म्हणतिल कां ? ३

रामचंद्र चालले मंदमंद पाउलीं
जनकनंदिनी सवे मंदचरण चालली !

वळुनि सहज मागुती
पाहतात रघुपती
दाटल्या नभांतुनी उष्णधार धावली १

विकल वल्लरी लता
अश्रुधार पाहतां
पक्षिपंख टाकिती, जान्हवीहि थांबली २

पाहतांच आसवें
रामहृदय कालवें
गहिवरे वसुंधरा आसवांत नाहली ३

# विठ्ठलाचे भेटी आला संतमेळा

विठ्ठलाचे भेटी आला संतमेळा
भीवरेच्या कांठीं रंगला सोहळा ।

भव्य वाळवंटीं
भाविकांची दाटी
वाहे खळखळा भक्तिभाव भोळा १

वाजती मृदंग
रंगले अभंग
येती पांडुरंग सोडुनि राऊळा २

विमानांची दाटी
होय नभापोटीं
देवांच्या अंतरीं सुखाचा उमाळा ३

झालें विश्व धुंद
प्राशुनी आनंद
आनंदाचा कंद डोलतो सावळा ४

# पांडुरंग पांडुरंग नामघोष चाले

पांडुरंग पांडुरंग नामघोष चाले
नामघोष कल्लोळांत संत दंग झाले !

टाळ मृदंग वाजती
संत कीर्तनीं नाचती
आत्मानंद भीवरेंत भक्तिभाव न्हाले १

वाळवंटीं नाम रंगे
नाम भीमेंत तरंगे
स्थिरचर संतासंगें 'पांडुरंग' बोले २

पांडुरंग पांडुरंग
भजनीं हो विश्व दंग
पांडुरंगही रंगून नामरंगीं डोले ३

## विठुराजा माझ्या ग आवडीचा

विठुराजा माझ्या ग आवडीचा
विठु माझा राणा ग पंढरीचा !

माझ्या विठुचा सावळा रंग
विठुनामीं संत झाले दंग
पाठिराखा विठु ग पतितांचा १

विठु उभा विटेवरी छान
विठुरायाचें सुंदर ध्यान
टिळा शोभे विठुला कस्तुरीचा २

तुकारामास लावि विठु वेड
विठु झाला दामाजिसाठीं धेड
भोळा विठु भुकेला भाविकांचा ३

मीही झालें विठुसाठीं वेडी
तोडिली मी संसाराची बेडी
मार्ग माझा विठुच्या नगरीचा ४



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. ग्रंथालय.

# पुंडलिका तूं बरवें केलें

पुंडलिका तूं बरवें केलें
भीमाकाठीं देव आणिले !

मायपित्यांची मंगल सेवा
सर्वसुखाचा तो तुज ठेवा
देव तुला मग कसा दिसावा
अघटित घडलें, श्रीविष्णूंनीं
'वर घे' म्हणुनी तुला याचिलें १

थांबायास्तव वीट फेंकिली
मूर्ति तीवरी उभी सावळी
युगें युगें जरि सरुनी गेलीं
परब्रह्म हें इथें तिष्ठतां
वैकुंठीच वैभव नटलें २

पंढरपुरिचा थाट आगळा
तिन्ही त्रिकाळीं गोड सोहळा
विठ्ठल कैवल्याचा पुतळा
भक्तीच्या भीमेंत डुंबतां
अगणित पापी तरले तरले ३

## पंढरिच्या वाटे

पंढरिच्या वाटे सडे अमृताचे
उधळिती सुगंध बाग गुलाबांचे !

पंढरिच्या वाटे पायघड्या छान
पुष्पपाकळयांनीं घातल्या जपून
करिती रंजन पाखरें मनाचें १

पंढरिच्या वाटे घुमती अभंग
भजनीं कीर्तनीं संत झाले दंग
घडतें दर्शन संत सज्जनांचें २

पंढरिच्या वाटे पाउली पाऊली
पडे पुण्यगांठी पातकांची होळी
मोक्षाची ही वाट साधन सुखाचें ३

## देव माझा विठू सावळा

देव माझा विठू सावळा
माळ त्याची माझिया गळा !

विठु राहे पंढरपुरीं
वैकुंठच हें भूवरी
भीमेच्या कांठीं डुल भक्तिचा मळा १

साजिरें रूप सुंदर
कटिं झळके पितांबर
कंठांत तुळशिचे हार कस्तुरी टिळा २

भजनांत विठू डोलतो
कीर्तनीं विठू नाचतो
रंगतो खुळा भक्तांचा विठुला लळा ३

## दीन मी पतित माझें कूळ

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क. ११७६४

दीन मी पतित माझें कूळ
तुझ्या मी चरणांची रे धूळ !

तुझें मज दर्शन अंतरलें
कशी मग वाहूं सांग फुलें
तुझ्यास्तव अंतर हें व्याकूळ १

कुठें तव पाहूं रे रूप
कसें मी जाळूं रे पाप
हवी मज तुझ्या कृपेची झूल २

नमन मी कळसाला करितें
सावळें रूप तिथें बघतें
पंढरी हें माझें राऊळ ३

नको मज अन्य प्रभू कांहीं
लीन हें चित्त तुझ्या पायीं
तूंच मज सर्व सुखाचें मूळ ४

## कुणि म्हणोत मजला कांहीं

कुणि म्हणोत मजला कांहीं
मी रतलें हरिच्या पायीं
ग मी रतलें हरिच्या पायीं !

संसारीं मम मन लागेना
काम सुचेना धाम सुचेना
त्यजिली मी तर वडिलजनांची भीतीमर्यादाही १

पतिसेवेचा होइ अनादर
हरिप्रेमानें भरलें अंतर
बनुनी मी निःस्संग नाचतें खुल्या दिशा मज दाही २

नाम हरीचें माझ्या वदनीं
रूप हरीचें माझ्या नयनीं
हरिमय माझें अवघें जीवन कणकण हरिमय होई ३

## नकोस येऊं द्याया दर्शन

नकोस येऊं द्याया दर्शन
तुला पाहतों मी रात्रंदिन !

दिशा उजळतां उषा हांसते
त्यांत तुझें प्रतिबिंब डोलतें
हास्य तुझें रे खुले मुलायम
झुळझुळणाऱ्या रविकिरणांतुन १

संध्या शोभे शांत मनोहर
त्यांत झुलें तव प्रसन्न अंतर
चंद्रकरांतुन हर्ष उधळिसी,
जगा लाभते शुभ आश्वासन २

केव्हां उठतें प्रचंड वादळ
क्षोभ मनींचा तुझ्याच केवळ
महाघोर प्रळयांत याचितों
तुझ्या कृपेचें अमृतसिंचन ३

त्रिभुवनपालक तूं करुणाघन
प्रेम उधळिसी चराचरांतुन
लीला नाटक अतुल दाविसी
या रूपांतुन त्या रूपांतुन ४

## त्रिभुवनपालक जरि मी ईश्वर

त्रिभुवनपालक जरि मी ईश्वर
मी भक्तांचा झालों चाकर !

अर्जुन माझा भक्त जिवाचा
असे सारथी मी तर त्याचा
स्वामी माझा पार्थ धनुर्धर १

पुंडलिकाचा भाव गोमटा
सोडुनि आलों मी वैकुंठा
युगे युगे मी उभा विटेवर २

सावंत्याचा मळा राखितों
कुंभाराची माती मळितों
देवभक्त हें सरलें अंतर ३

कशास पूजा या जपमाळा
भक्तिविना हा व्यर्थ सोहळा
भक्तिस्तव मी क्षुधित निरंतर ४

# जें हरिसाठीं सुंदर तें

जें हरिसाठीं सुंदर तें
सुंदर तें जें हरि भजतें !

हरिभजनीं रत सुंदर वाणी
हरियश गाती सुंदर गाणीं
हरिसेवक जन सुंदर ते १

नयनहि सुंदर जे हरि बघती
कर्णहि सुंदर हरिगुण श्रवती
हरिपादिं नत शिर सुंदर तें २

हरिचिंतन करीं त मन सुंदर
झिजे हरीस्तव ती तनु सुंदर
हरिमय जीवन सुंदर तें ३

तें स्थल सुंदर श्रीहरी जेथें
त्रिभुवनिं सुंदर हरिशी नातें
सुंदर सुंदर हरिपद तें ४

# सजा दे देपण असली नको

सजा द देपण असली नको
मनांतिल प्रेम हिरावूं नको !

बुडविशील जरि मला सागरीं
नाम असावें तुझेंच अधरीं
ध्यान असावें तुझें अंतरीं, त्यांत अंतर नको १

तुडव मला तूं तुझ्या पदतलीं
घाव गदेचा खुशाल घाली
भूषण तें मी मिरविन भालीं, तें तरि चुकवूं नको २

लोभ असो पण तुझा असूं दे
राग असो पण तुझा असूं दे
उरीं उपेक्षा प्रभो नसूं दे, ती निर्दयता नको ३

## कुंजवनीं सखे ग मला जाउदे

कुंजवनीं सखे ग मला जाउदे
शामसुंदर रूप मला पाहुदे !

मुरलिचे घुमति गडे सूर
यमुनेला स्वरांचा चढे पूर
तरंगांत स्वरांच्या मला पोहुदे १

किति खेळ हरिचे बाई गोड
मधुबोलांनीं लावितो हा वेड
हरिसाठीं वेडी ग मला होउदे २

याच्या थट्टेचा येतो बाई राग
किती सोसावा छळ तूंच सांग
लटक्या रागाचं लेणं मला लेउदे ३

हरिविणे सुचेना मज कांहीं
ध्यानीं मनीं ध्यासच दुजा नाहीं
कालिंदींत प्रेमाच्या मज न्हाउदे ४

## राधिके सांज झाली ना !

राधिके सांज झाली ना !
गोपिके सांज झाली ना !
झडकरी जा अपुल्या सदना !

आलीस कधींची राधे यमुनेवर
कां अजुन भेटला नाहीं शारंग्धर
करणार प्रतीक्षातरी किती सांग ना ? १

निःस्तब्ध काठ तर यमुनेचा जाहला
या संध्याछाया भिववितील ग तुला
ग्रासिले तमानें यमुनेच्या जीवना २

गुंतला कुणासह मोहन कोठेतरी
विसरला तुला ग लबाड तो श्रीहरी
नच ओळखिले तूं अजुनी त्याच्या गुणा ३

# नको रे तुझा खेळ

नको रे तुझा खेळ नको रे तुझा पावा
मी सासुरवाशिण साधु नको दावा !

तूं नंदाचा रे नंदन अति लाडका
अन् संसाराचा पाश माझिया सुखा
मन दोहीकडे, मेळ कसा रे जमावा १

हे तुझे सौंगडी खट्याळ भारी हरी
करितात कुठेंही माझी बघ मस्करी
कुणि सांगितल घरीं, बोलतिल सासुजावा २

यमुनेवर जातां नकोस अडवूं वाट्
हा घाट कुजबुजे होइल रे बोभाट्
माझ्या मनांतला भाव तुला तरी समजावा ३

# राधिके झालिस कां बावरी

राधिके झालिस कां बावरी ?
गुंतले सांग कुठें श्रीहरी ?

पळ न जायचा तुझ्यावाचुनी
ध्यास तयाचा तुला निशिदिनीं
कसे कुणावर रुसले–गेले
तुला नकळता दुरी ! १

दिसे न शामल वदन मनोहर
सुरस साजिरी मूर्ती सुंदर
नाहीं वाजली हरिची
मंजुळ मनहारी बासरी २

नकोस आणूं नयनीं पाणी
येइल ग तो शारंगपाणी
असेल केली तुझी मस्करी,
नको झुरूं अंतरीं ३

शीळ कुणाची सूर कशाचे ?
मधुर भाव कां नयनीं नाचे ?
नकोस नाचूं थांब जराशी,
बोल तरी पळभरी ४

## कुठें ग चाललीस गौळणी

कुठें ग चाललीस गौळणी ?
उगवला नाहीं वासरमणी !

तमाचें रेंगाळें पाउल
अजुनि ना तेजाची चाहुल
गोकुळ नगरी अजुनि
न काढी झोपेची ओढणी १

अजुनि नच किलबिलतीं पांखरें
धुंद नच स्वप्नांची ओसरे
अशा अवेळीं एकटीच तूं
सोबतिला नच कुणी २

मुरलिचा आला कां ग स्वर ?
उभा कां माधव यमुनेवर ?
जगावेगळ्या या वेडाला
वेड म्हणावं कुणी ! ३

मी यमुनाकिनारीं फसलें ग
माझी मलाच हरवुन बसलें ग !

हा कृष्ण अतिच उद्धट
फोडी दह्यादुधाचे घट
मी धीट परी–तो चतुर हरी – तो
हसतां मीही हसले ग ? १

बोलणार नव्हतें मुळीं
तो बोलुन फुलवी कळी
किति गोड हरी–मम भान हरी–
हें लाघव याचें कसलें ग २

याच्यापुढें धिटाई पळे
अभिमान पुरा विर्घळे
घट माझा फुटे–उरीं प्रीत नटे,
नवसुखांत मी रसरसलें ग ३

## येतो स्वप्नांत बाई श्रीहरी

येतो स्वप्नांत बाई श्रीहरी !
रूप सावळें, तेज आगळें,
भाळावर कस्तुरी !

काळी घोंगडी खांद्यावरती
तुळशीमाळा गळयांत रुळती
मंजुळ मंजुळ वाजवितो हा
मनहारी बासरी १

मोर मुगुट शिरीं, कटी पितांबर
कानि कुंडलें डुलती सुंदर
कोटि मदनही ओवाळावे
याच्या कांतीवरी २

कमलवदन हा हळुंच हसुनी
खुणावितो ग कमलकरांनीं
खट्याळ माधव स्वप्नांतहि
मज छळितो नानापरी ३



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थापना
अनुक्रम ........ वि: ........
क्रमांक ........ नों: दि: ........

# इथेंच आणी या बांधावर

इथेंच आणी या बांधावर –
अशीच शामल वेळ
सख्यारे किती रंगला खेळ !

शांत धरित्री शांत सरोवर
पवन झुळझुळे शीतल सुंदर
अबोल, अस्फुट दोन जिवांचा
अवचित जमला मेळ १

रात राणिचा गंध दर्वळे
धुंद कांहिसे आंतुन उसळे
चंद्र हासला, लवलीखालीं
नक्षत्रांची वेळ २

पहाटच्या त्या द्वांत भिजुनी
विरली हळुं हळुं सुंदर रजनी
स्वप्न सुमांवर अजुनि तरंगे
ती सोन्याची वेळ ३

# सख्या मी येऊं कां रे आंत

सख्या मी येऊं कां रे आंत ?
दाटलि रे बाहेर भयकर
काळोखाची रात !

मिटली जगतामधलीं दारें
मठींत दडलें जीवन सारें
मला कुणाची सोबत रे
या भीषण अंधारांत ? १

वादळ उठलें दिशा कापती
कशी सावरू तनु थरथरती
थरथरते आंतली जिवाची
नाजुकशी फुलवात २

पाउस आतां येइल राया
कुठें लपवुं ही दुबळी काया
सख्या उबारा दे रे तुझिया
सोन्याच्या सदनांत ३

## चंद्राच्या घरांत लागले दिवे

चंद्राच्या घरांत लागले दिवे
कसं सांगूं – काय मज हवे !

या शीतल झुळुकांतुन
ते स्मरती हसरे क्षण
तो नंदनवनिंचा सुगंध मज आठवे १

ही नभीं चंद्ररोहिणी
मी एकलीच विरहिणी
सुममाला सुकली ओघळलीं आसवें २

चंद्रा – निरोप तरि सांग ना
सांग – ना – झुरे मोहना
जा सांग अजुनिही आस उरीं पालवे ३

## मी सुगंध उधळित आलें रे

मीं सुगंध उधळित आलें रे
तुझ्या पथावर मृदुल फुलांची
पायघडी मी झालें रे !

कलावंत तूं कलावती मी
चंद्ररोहिणी जोडी नामी
सौंदर्याचें वेड तुला मी
नवसुंदरता ल्यालें रे   १

चरणीं माझ्या मधुर नूपरे
नयनि नाचती भाव हासरे
नवनवतीच्या प्रीतफुलांनीं
तनुमन माझें नटलें रे   २

तव अधरींचें मृदुल हास्य तें
तुझ्या मनींचें गूज सांगतें
अबोल जरि तूं, ओळखिल मी
तुजला मी आवडलें रे   ३

## मी मधुर स्वरांची राणी

मी मधुर स्वरांची राणी
आलें घुमवित मंजुळ गाणीं !

रसिकराज तूं खरा मोहना
तुजसाठीं ही कला साधना
तुझी नि माझी प्रीत पुराणी १

मधुवीणेच्या झंकारांतुन
मृदुभावांचें फुलविन उपवन
पूजिन तुज मी स्वरसुमनांनीं २

विसरुन जाऊ रे मी तूपण
विसरुन अवघें ऐहिक जीवन
सूरसागरीं जाऊं विरुनी ३

## मनीं माझिया नटलें गोकुळ

मनीं माझिया नटलें गोकुळ
मी राधा तूं कान्हा प्रेमळ !

वाजवितां तूं मधुर बासरी
नंदन माझ्या फुलें अंतरीं
फुटते घागर, भिजते साडी,
खट्याळ हसतें कालिंदीजळ १

मथुरेच्या रे वाटेवरती
आडविसी तूं धरुनी हातीं
खुशाल लुटिसी दहिदुधलोणी,
गोपसख्या तूं भारी अवखळ २

यमुनाकाठीं रास रंगतो
रमतो आपण मीपण हरतो
अंध जगाला कशी दिसावी –
अपुली प्रीती – अपुलें गोकुळ ३

## कशी समजावूं कोणाला

११७०८४
REFBK-0011764

कशी समजावूं कोणाला
कशि ग समजावूं कोणाला
म्हणति जन वेड लागलें हिला !

मज संध्येचे रंग खुलविती
चंद्र चांदण्या गूज सांगती
मध्यान्हीचा शीतल वारा
शीळ घालितो मला १

मला आवडूं लागे कविता
एकांताची कळे रम्यता
मी माझ्याशी हसतें, पुसतें –
गुपित माझें मला २

चोरुन मी यमुनेवर जातें
लपुन मुरलीसूर ऐकते
घट डोईचा फुटे,
जीव या भासांतच रंगला ३



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलांतर.
अनुक्रम ७११२० वि: ३।८८
क्रमांक ९।८८ नों दि: ९।१।६।८८